वाचा:- 1. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-2015/प्रक्र 45/ज-1 दि.01.06.2015.
2. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
3. उपविभागीय अधिकारी, नांदेड यांचे पत्र दिनांक 13.01.2017.
4. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे पत्र दिनांक. 16.01.17, दिनांक 18.01.17, दिनांक 19.01.17.
5. सहायक संचालक नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, नांदेड यांनी दि.18.01.2017.

OFFICE OF THE COLLECTOR ★ NANDED ★

क्र.2017/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-02
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. 20 जानेवारी, 2017.

**आदेश**

**विषयः- मौ. कौठा ता.जि. नांदेड येथील ग.क्र. 80 मधील क्षेत्र 8 आर (आठ आर) शासकीय जमीन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस सार्वजनिक सोयी करिता उपलब्ध करुन देणे बाबत.**

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 अन्वये उपविभागीय अधिकारी, नांदेड यांनी मौ. कौठा ता. जि. नांदेड येथील ग.क्र.80 मधील 08 आर (आठ आर) शासकीय जमीन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस सार्वजनिक सोयी करिता उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव सादर करुन शिफारस ही केली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.04 अन्वये आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी अनर्जित प्राप्तीच्या एकूण रक्कमेपैकी रु. 15,00,000/- (रु. पंधरा लाख) चे अंशतः रक्कमेचे धनादेश या कार्यालयास सादर करुन उर्वरीत रक्कम रु. 45,83,000/- (रु. पंचेचाळीस लाख त्रेऐंशी हजार) जमा करण्यांसाठी मार्च 2017 पर्यंत मुदतवाढ मिळणे बाबत विनंती केली असल्यामुळे सदर प्रकरणांत विषयांकित जमिनीचा चालु वर्षाच्या मुल्यांकनानुसार भोगवटा मुल्याची उर्वरीत रक्कम 28 फेब्रुवारी 2017 पूर्वी आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड भरुन देणार असल्याचे पूर्वअट निर्धारीत करण्यांत आली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 05 अन्वये सहायक संचालक नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, नांदेड यांनी विषयांकित जमीनीबाबत सहायक संचालक नगररचना व मनपा नियमावली यांच्या निर्धारीत अटी व शर्तीचे पालन करण्यांबाबत आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी संदर्भ क्र. 04 अन्वये हमीपत्र सादर केले असुन त्यानुसार अटी व शर्तीची पूर्तता महानगरपालिकेकडून करण्यांत येईल अशी पूर्वअट निर्धारीत करण्यांत आली आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र.01 च्या शासन निर्णयातील तरतूदी तसेच संदर्भ क्र.02 शासन अधिसूचना दिनांक 31.12.2015 मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम 1971 मधील नियम 6 मधील नव्याने समाविष्ट करण्यांत आलेले पोट नियम (3)(अ) अन्वये "ज्या ठिकाणी नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतूदीन्वये प्रसिध्द करण्यांत आलेल्या प्रारुप अथवा अंतिम विकास आराखडयातील आरक्षण विकसीत करण्यांसाठी शासकीय जमीन आवश्यक असेल, तेथे सदर शासकीय जमिनीचे बाजारमूल्य कितीही असो, अशी जमीन संबंधीत नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना प्रदान करण्यांस जिल्हाधिकारी सक्षम राहतील, अशावेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चीत करेल तेवढी संबंधीत जागेचे भोगवटामूल्य जिल्हाधिकारी यांनी वसूल करणे आवश्यक राहिल" या तरतूदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. कौठा ता. जि. नांदेड येथील ग.क्र.80 मधील 08 आर (आठ आर) शासकीय जमीन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस सार्वजनिक सोयी करिता उपलब्ध करुन देणेस्तव संदर्भ क्र.01 मधील परिपत्रकातील परि.क्र.02 तील तरतूदीनुसार अन्वये विषयांकित जमिनीचा चालु वर्षाच्या मुल्यांकनानुसार भोगवटा मुल्याची उर्वरीत रक्कम आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड भरुन देणार असल्याचे पूर्वअट तसेच इतर खालील अटी व शर्तीवर आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना सदर जमीनीचा तात्पुरत्या स्वरुपात ताबा देण्यात येत आहे.

**( कृपया मागे पहावे )**

**अटी व शर्ती:**

1. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-2015/प्रक्र 45/ज-1 दिनांक 01.06.2015 मधील परि क्र.2 तील तरतूदीनुसार विषयांकित जमिनीचा प्रचलित बाजारमुल्य सन 2016-17 चे मुल्यांकनानुसार भोगवटामुल्याची उर्वरीत रक्कम रु.45,83,000/-(अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख त्रेऐंशी हजार) आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी ग्रास चालान द्वारे दिनांक 28 फेब्रुवारी 2017 पूर्वी शासनजमा करुन तसा अनुपालन या कार्यालयास सादर करावा.
2. संदर्भ क्र.05 अन्वये सहायक संचालक नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, नांदेड यांनी विषयांकित जमीनीबाबत सहायक संचालक नगररचना व मनपा नियमावली यांच्या खालील निर्धारीत अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहिल.
   A. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस लागू असलेल्या बांधकामनियंत्रण नियमावलीतील सोई व सुविधा अंतर्गत (Amenity Space) अनुज्ञेय वापराकरिता त्यातील नियमास अधिन राहून वापर करता येऊ शकेल. तसेच वाढीव क्षेत्राची विकास योजना तयार करतांना ती उक्त प्रयोजनासाठी आरक्षित करुन ती शासन मंजुरीनंतर विकसीत करता येऊ शकेल.
   B. जागेवर प्रत्यक्षात अतिक्रमण असल्याने ते काढून घेणे तसेच विद्यमान G.S.R. पासुन सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक राहिल.
   C. विषयांकित जागा नांदेड-लातूर या राज्यरस्ता/ राज्यमार्गालगत असल्याने ईमारत रेषा/नियंत्रण रेषेबाबत संबंधीत विभागाचे अभिप्राय घेणे योग्य राहिल.
   D. जागेवर असलेल्या अनाधिकृत बांधकामे निष्कासित करणेची कार्यवाही करणे आवश्यक राहिल.
3. जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संबधीत कार्यालयाची राहील.
4. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा उपयोग करण्यांत यावा तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पटटयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
5. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्यासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.
6. उपविभागीय अधिकारी नांदेड व तहसिलदार नांदेड यांनी मोजणी नकाशा व चतु:सिमे प्रमाणे 08 आर जमिनीचा तात्पुरता ताबा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना हस्तांतरीत करावा व अधिकार अभिलेखाच्या इतर हक्कात "आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांचेकडे हस्तांतरीत" अशी नोंद घ्यावी व अभिलेखाच्या दोन प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.
7. ठराविक अंतरावर (100 मी. प्रमाणे) झाडे लावणे आवश्यक असून त्यांचे संगोपन करणे बंधन कारक आहे.
8. शासन परिपत्रक क्र.जमीन08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 नुसार शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे महापालिका यांना बंधनकारक राहिल. तसेच सदर नमुना क्र.18 च्या बोर्डाचे मजकूर तहसीलदार नांदेड यांचेकडून हस्तगत करावे.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
2. उपविभागीय अधिकारी नांदेड यांना माहितीस्तव.
3. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना माहितीस्तव.
4. तहसिलदार नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
5. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. शासन निर्णय क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.45/ज-1 मंत्रालय मुंबई, दिनांक 01.06.15.
2. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
3. या कार्यालयाचे आदेश क्र.2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-09 दि. 28.03.2016.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

क्र.2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-09
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. 16 फेब्रुवारी, 2017.

<u>अंतिम ताबा आदेश</u>

**विषयः- मौ. माहूर ता. माहूर येथील ग.क्र. 195 मधील क्षेत्र 1.20 हे.आर जमीन माहूर नगरपंचायत च्या प्रशासकीय इमारत बांधकामासाठी मिळणे बाबत.**

-x-

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 या कार्यालयाचे आदेश क्र. 2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-09 दिनांक 28.03.2016 अन्वये मौ. माहूर ता. माहूर येथील ग.क्र.195 मधील क्षेत्र 1.20 हे.आर जमीन माहूर नगरपंचायतच्या इमारतीच्या बांधकामासाठी देण्याबाबत मुख्याधिकारी, नगरपंचायत, माहूर यांना संदर्भ क्र.01 मधील शासन निर्णयान्वये स्थानिक प्रधिकरण म्हणून प्रचलित बाजारमूल्यांनुसार संपूर्ण किंमत चालु वर्ष 2015-16 चे मुल्यांकन (भोगवटामुल्य) रु. 1,08,67,500/- (एक कोटी आठ लक्ष सदुसष्ट हजार पाचशे रुपये) असुन माहूर नगरपंचायत यांनी सदरील रक्कम चालानद्वारे शासन जमा केलेली असल्यामुळे विषयांकित जमिनीचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 अन्वये या कार्यालयाचे आदेशात नमूद अटी व शर्तीस अधिन राहून विषयांकित जागेचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे त्यांचे तंतोतंत पालन करणे माहूर नगरपंचायत यांना बंधनकारक राहिल.

त्याअर्थी संदर्भ क्र.01 च्या शासन निर्णयातील तरतूदी तसेच संदर्भ क्र.02 शासन अधिसूचना दिनांक 31.12.2015 मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम 1971 मधील नियम 6 मधील नव्याने समाविष्ट करण्यांत आलेले पोट नियम (3)(अ) अन्वये "ज्या ठिकाणी नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतूदीन्वये प्रसिध्द करण्यांत आलेल्या प्रारुप अथवा अंतिम विकास आराखडयातील आरक्षण विकसीत करण्यांसाठी शासकीय जमीन आवश्यक असेल, तेथे सदर शासकीय जमिनीचे बाजारमूल्य कितीही असो, अशी जमीन संबंधीत नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना प्रदान करण्यांस जिल्हाधिकारी सक्षम राहतील, अशावेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चीत करेल तेवढी संबंधीत जागेचे भोगवटामूल्य जिल्हाधिकारी यांनी वसूल करणे आवश्यक राहिल" या तरतूदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. माहूर ता. माहूर येथील ग.क्र. 195 मधील क्षेत्र 1.20 हे.आर जमीन माहूर नगरपंचायतच्या इमारतीच्या बांधकामासाठी देण्यांबाबत संदर्भ क्र. 03 अन्वये विषयांकित जमिनीचे भोगवटामूल्य चालानद्वारे शासन जमा करून या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भीय आदेशात नमूद अटी व शर्तीस अधिन राहून विषयांकित जागेचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे त्यांचे तंतोतंत पालन करणे माहूर नगरपंचायत यांना बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून मुख्याधिकारी, माहूर नगरपंचायत यांना सदर जमिनीचा अंतिम ताबा देण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. संदर्भ क्र.03 अन्वये या कार्यालयाचे आदेश क्र. 2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-09 दिनांक. 28.03.2016 मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून विषयांकित जागेचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे त्यांचे तंतोतंत पालन करणे माहूर नगरपंचायत यांना बंधनकारक राहिल.
2. सहसंचालक नगररचना यांचे पत्र क्र. वि.यो.माहूर/जि.नांदेड/क्रिडासंकुल/प्रक्र2/सहसंनरऔ/2137 दिनांक 18.12.2015 मध्ये नमूद अटी/ शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहिल.
3. जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील.

**( कृपया मागे पहावे )**

4. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पटटयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
5. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्यासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.
6. तहसिलदार माहूर यांनी मोजणी नकाशा व चतु:सिमे प्रमाणे ग.क्र. 195 मधील क्षेत्र 1.20 हे.आर जमीन जमिनीचा ताबा मुख्याधिकारी, नगरपंचायत, माहूर यांना देण्यांपूर्वी संदर्भ क्र.03 मधील आदेशात नमूद अटी व शर्तीचे तंतोतंत पालन नगरपंचायत, माहूर यांचेकडून झाले आहे याची खात्री करुन तद्नंतर अधिकार अभिलेखांत ताब्याबाबत नोंद घेवून अहवाल /अभिलेख दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.
7. शासन परिपत्रक क्र.जमीन08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 नुसार शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना 18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे नगरपंचायत माहूर यांना बंधनकारक राहिल. तसेच सदर नमुना क्र.18 च्या बोर्डाचे मजकूर तहसीलदार माहूर यांचेकडून हस्तगत करावे.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

CONFIDENTIAL

**प्रतिलिपी,**

1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
2. उपविभागीय अधिकारी किनवट यांना माहितीस्तव.
3. तहसिलदार माहूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
4. मुख्याधिकारी, नगरपंचायत माहूर यांना माहितीस्तव
5. तलाठी सज्जा मौ. माहूर ता. माहूर जि.नांदेड
6. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. शासन निर्णय क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.45/ज-1 मंत्रालय मुंबई, दिनांक 01.06.15.
2. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
3. या कार्यालयाचे आदेश क्र.2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-10 दि. 30.06.2016.

क्रं.2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-10
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. 16 फेब्रुवारी, 2017.

अंतिम ताबा आदेश

**विषयः- कंधार नगरपरिषद हद्दीतील स.नं. 05 व 06 मधील 0.71 हे.आर आणि स.नं. 02 मधील 0.75 हे.आर शासकीय जमीनीचे शॉपिंग सेंटर साठी कंधार नगरपरिषदेला हस्तांतर.**

-x-

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 या कार्यालयाचे आदेश क्र. 2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-10 दिनांक 30.06.2016 अन्वये मौजे कंधार ता. कंधार जि. नांदेड येथील शासकीय जमीन आरक्षण क्रमांक 79, 80, व 81 मधील स.न. 5 मध्ये 0.47 हे.आर, स.नं. 6 मध्ये 0.24 हे.आर आणि स.नं. 02 मधील 0.75 हे.आर जमीन असे एकूण वाटपासाठी निर्विवाद असलेली 1.46 हे. आर. जमीनीचा कंधार नगरपरिषद यांना शॉपिंग सेंटरच्या उभारणीसाठी देण्याबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, कंधार यांना संदर्भ क्र.01 मधील शासन निर्णयान्वये स्थानिक प्रधिकरण म्हणून प्रचलित बाजारमूल्यांनुसार संपूर्ण किंमत चालु वर्ष 2015-16 चे मुल्यांकन (भोगवटामुल्य) रु. 3,58,00,000/- (तीन कोटी अठ्ठावन्न लक्ष रुपये) असुन कंधार नगरपरिषद यांनी दिनांक 28.03.2016 रोजी सदर रक्कम चालानद्वारे शासन जमा केलेला असल्यामुळे विषयांकित जमिनीचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 अन्वये या कार्यालयाचे आदेशात नमूद अटी व शर्तीस अधिन राहून विषयांकित जागेचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे त्यांचे तंतोतंत पालन करणे नगरपरिषद कंधार यांना बंधनकारक राहिल.

त्याअर्थी संदर्भ क्र.01 च्या शासन निर्णयातील तरतूदी तसेच संदर्भ क्र.02 शासन अधिसूचना दिनांक 31.12.2015 मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम 1971 मधील नियम 6 मधील नव्याने समाविष्ट करण्यांत आलेले पोट नियम (3)(अ) अन्वये "ज्या ठिकाणी नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतूदीन्वये प्रसिध्द करण्यांत आलेल्या प्रारुप अथवा अंतिम विकास आराखडयातील आरक्षण विकसीत करण्यासाठी शासकीय जमीन आवश्यक असेल, तेथे सदर शासकीय जमिनीचे बाजारमूल्य कितीही असो, अशी जमीन संबंधीत नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना प्रदान करण्यांस जिल्हाधिकारी सक्षम राहतील, अशावेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चीत करेल तेवढी संबंधीत जागेचे भोगवटामूल्य जिल्हाधिकारी यांनी वसूल करणे आवश्यक राहिल" या तरतूदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड मौजे कंधार ता. कंधार जि. नांदेड येथील शासकीय जमीन आरक्षण क्रमांक 79, 80, व 81 मधील स.न. 5 मध्ये 0.47 हे.आर, स.नं. 6 मध्ये 0.24 हे.आर आणि स.नं. 02 मधील 0.75 हे.आर जमीन असे एकूण वाटपासाठी निर्विवाद असलेली 1.46 हे. आर. जमीनीचा कंधार नगरपरिषद यांना शॉपिंग सेंटरच्या उभारणीसाठी देण्यांबाबत संदर्भ क्र. 03 अन्वये विषयांकित जमिनीचे भोगवटामूल्य चालानद्वारे शासन जमा करुन या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भीय आदेशात नमूद अटी व शर्तीस अधिन राहून विषयांकित जागेचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे त्यांचे तंतोतंत पालन करणे नगरपरिषद कंधार यांना बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून मुख्याधिकारी, नगरपरिषद कंधार यांना सदर जमिनीचा अंतिम ताबा देण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. संदर्भ क्र.03 अन्वये या कार्यालयाचे आदेश 2015/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-10 दि.30.06.2016 मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून विषयांकित जागेचा आगावू ताबा देण्यांत आलेला आहे त्यांचे तंतोतंत पालन करणे नगरपरिषद कंधार यांना बंधनकारक राहिल.

**( कृपया मागे पहावे )**

2. सहायक संचालक नगररचना नांदेड यांचे पत्र क्र. 245 दिनांक 26.02.2016 यांचे पत्रात नमुद अटी व शर्तीच्या अनुषंगाने आरक्षणाबाहेरील क्षेत्राचा विकास करणे पूर्वी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधि- नियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदलाची कार्यवाही करून शासनाच्या मंजुरी नंतरच विकास कामे हाती घेता येईल.
3. कंधार नगरपरिषदेसाठी मंजुर विकास योजना आराखडयानुसार विकास करणे बंधनकारक राहिल नगरपरिषदेकडून अथवा शासनाच्या योजनेतुन विकास करावयाचा झाल्यास जागांचे विकास आराखडे नगररचना विभागाकडून मंजुर करुन घेणे बंधनकारक राहिल, तसेच सदर जागेचा विकास नगर परिषदेने करणे आवश्यक असेल. नगरपरिषदेने इतर कोणत्याही माध्यमातुन सदर जागेचा विकास करावयाचा झाल्यास रितसर प्रस्ताव शासनाकडून मंजुर करुन घेणे नगरपरिषदेस बंधनकारक राहिल.
4. कंधार नगरपरिषदेसाठी मंजुर विकास योजना आराखडयानुसार आरक्षण क्र. 79 व 80 च्या मागील भागात त्या क्षेत्राच्या 15 % दुकान केंद्रासाठी बांधकाम अनुज्ञेय आहे. उर्वरीत क्षेत्रासाठी विकास करावयाचा झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदलाची कार्यवाही करून त्यास शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर विकास कामे हाती घेण्यांत यावी.
5. नवीन बांधकाम करतांना या गटात अस्तित्वात असलेल्या बांधकामांना कोणताही धोका पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच नगरपरिषदेच्या बांधकाम नियमावलीनुसार अस्तित्वात असलेल्या बांधकामाच्या बाजुस नियमानुसार समास अंतरे (Marginal Distances) सोडणे बंधनकारक राहील.
6. जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी कंधार नगरपरिषदेची राहील.
7. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्यासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पटटयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
8. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्यासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.
9. तहसिलदार कंधार यांनी मोजणी नकाशा व चतु:सिमे प्रमाणे स.नं.5, 6 मधील 0.71 हे.आर व स.नं. 2 मधील 0.75 हे.आर असे एकूण 1.46 हे.आर जमिनीचा ताबा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कंधार यांना देण्यांपूर्वी संदर्भ क्र.03 मधील आदेशात नमूद अटी व शर्तीचे तंतोतंत पालन नगरपरिषद कंधार यांचेकडून झाले आहे याची खात्री करुन तद्नंतर अधिकार अभिलेखांत ताब्याबाबत नोंद घेवून अहवाल /अभिलेख दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.
10. शासन परिपत्रक क्र.जमीन08/2012/प्रक्र 51/ज-1दिनांक23.10.2012 नुसार शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे नगरपरिषद यांना बंधनकारक राहिल. तसेच सदर नमुना क्र.18 च्या बोर्डाचे मजकूर तहसीलदार कंधार यांचेकडून हस्तगत करावे.

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
2. उपविभागीय अधिकारी कंधार यांना माहितीस्तव.
3. तहसिलदार कंधार यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
4. मुख्याधिकारी, नगरपरिषद कंधार यांना माहितीस्तव.
5. तलाठी सज्जा मौ. कंधार ता. कंधार जि.नांदेड
6. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. शासन निर्णय क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.45/ज-1 मंत्रालय मुंबई, दिनांक 01.06.15.
2. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
3. तहसीलदार अर्धापूर यांचे कार्यालयीन पत्र दिनांक 04.10.2016.
4. सहा. संचालक नगररचना विभाग, नांदेड यांचे कार्यालयीन पत्र दिनांक 06.10.2016.

क्रं.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-14
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. 30 मार्च, 2017.

## अंतिम ताबा आदेश

**विषयः- मौ. अर्धापूर ता. अर्धापूर येथील ग.क्र. 600 मधील क्षेत्र 28 आर शासकीय गायरान जमीन अग्निशमन केंद्रासाठी अर्धापूर नगरपंचायत कार्यालयास मिळणे बाबत.**

-x-

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 अन्वये मौ. अर्धापूर ता. अर्धापूर येथील ग.क्र.600 मधील क्षेत्र 28 आर जमीन अग्निशमन केंद्राच्या उभारणीसाठी देण्याबाबत तहसीलदार अर्धापूर यांनी जमीन मागणी बाबतचा प्रस्ताव सादर करुन जमीन प्रदान करणे बाबत शिफारसही केली आहे. त्यानुसार मुख्याधिकारी, नगरपंचायत, अर्धापूर यांनी संदर्भ क्र.01 मधील शासन निर्णयान्वये स्थानिक प्राधिकरण म्हणून प्रचलित बाजारमूल्यांनुसार संपूर्ण किंमत चालु वर्ष 2016-17 चे मुल्यांकन (भोगवटामुल्य) रक्कम रु. 24,90,000/- (चोवीस लक्ष नव्वद हजार रुपये) चालानद्वारे शासन जमा केलेली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.04 अन्वये सहा. संचालक नगररचना विभाग, नांदेड यांनी अर्धापूर नगरपंचायत क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजनेतील प्रारुप आराखड्यानूसार विषयांकित 28 आर जमिनीपैकी नियोजित विकास योजना रस्त्याचे रुंदीकरणासाठी बाधित क्षेत्र म्हणून 03 आर (300 चौमी) जागा राखीव ठेवण्यांत येऊन उर्वरीत 25 आर (2500 चौमी) जमीनीचा " अग्निशमन केंद्र " हा वापर अनुज्ञेय असल्याचे अहवाल सादर केला आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र.01 च्या शासन निर्णयातील तरतूदी तसेच संदर्भ क्र.02 शासन अधिसूचना दिनांक 31.12.2015 मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम 1971 मधील नियम 6 मधील नव्याने समाविष्ट करण्यात आलेले पोट नियम (3)(अ) अन्वये "ज्या ठिकाणी नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतूदीन्वये प्रसिध्द करण्यांत आलेल्या प्रारुप अथवा अंतिम विकास आराखडयातील आरक्षण विकसीत करण्यासाठी शासकीय जमीन आवश्यक असेल, तेथे सदर शासकीय जमिनीचे बाजारमूल्य कितीही असो, अशी जमीन संबंधीत नियोजन प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण यांना प्रदान करण्यांस जिल्हाधिकारी सक्षम राहतील, अशावेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चीत करेल तेवढी संबंधीत जागेचे भोगवटामूल्य जिल्हाधिकारी यांनी वसूल करणे आवश्यक राहिल" या तरतूदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. अर्धापूर ता. अर्धापूर येथील ग.क्र.600 मधील क्षेत्र 28 आर जमीन अग्निशमन केंद्राच्या उभारणीसाठी देण्याबाबत खालील अटी व शर्तीस अधिन राहून मुख्याधिकारी, अर्धापूर नगरपंचायत यांना सदर जमिनीचा अंतिम ताबा देण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. सहा. संचालक नगररचना विभाग, नांदेड यांचे कार्यालयीन पत्र दिनांक 06.10.2016 मध्ये नमूद अट मौ. अर्धापूर ता. अर्धापूर येथील गायरान ग.क्रं. 600 मधील 2800 चौमी जागेपैकी नियोजित 15 मी. विकास योजना रस्त्याचे रुंदीकरणासाठी बाधित क्षेत्र म्हणून 03आर(300 चौमी) जागा राखीव ठेवण्यां बाबतच्या नगररचना विभागाच्या अटी/ शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.
2. जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संबधीत कार्यालयाची राहील.

( कृपया मागे पहावे )

3. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पटटयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
4. महसूल व वन विभागाचे शासन निर्णय दिनांक 11.01.2017 मधील नुसार ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आलेली आहे त्याच प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यांत यावा तसेच जमीन प्रदान आदेशाच्या तारखेपासुन तीन वर्षात कायमस्वरुपी इमारतीचे बांधकाम करणे बंधनकारक राहिल.
5. तहसिलदार अर्धापूर यांनी मोजणी नकाशा व चतु:सिमे प्रमाणे ग.क्र. 600 मधील 28 आर जमिनीचा ताबा मुख्याधिकारी, नगरपंचायत, अर्धापूर यांना देऊन अधिकार अभिलेखांत त्याबाबतची नोंद घेवून अहवाल /अभिलेख दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.
6. शासन परिपत्रक क्र.जमीन08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 नुसार शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना 18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे नगरपंचायत अर्धापूर यांना बंधनकारक राहिल. तसेच सदर बोर्डाचे मजकूर तहसीलदार अर्धापूर यांचेकडून हस्तगत करावे.
7. ठराविक अंतरावर (किमान 100 चौ.मी. च्या अंतरावर एक वृक्ष) झाडे लावणे आवश्यक असून त्यांचे संगोपन करणे बंधनकारक आहे.

**(स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
2. उपविभागीय अधिकारी नांदेड यांना माहितीस्तव.
3. तहसिलदार अर्धापूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
4. मुख्याधिकारी, नगरपंचायत अर्धापूर यांना माहितीस्तव
5. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करीता.**

CONFIDENTIAL

वाचा:- 1. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. सहायक संचालक नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, नांदेड यांनी दि.18.01.2017.
3. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे पत्र दिनांक.30.03.2017.
4. या कार्यालयाचे आदेश क्रं.2017/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-02 दि. 20.01.2017

OFFICE OF THE COLLECTOR ★ NANDED ★

क्रं.2017/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-02
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. 31 मार्च, 2017.

## अंतिम ताबा आदेश

**विषयः- मौ. कौठा ता.जि. नांदेड येथील ग.क्र. 80 मधील क्षेत्र 8 आर (आठ आर) शासकीय जमीन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस सार्वजनिक सोयी करिता उपलब्ध करून देणे बाबत.**

ज्याअर्थी संदर्भ क्र.04 अन्वये या कार्यालयाचे आदेशान्वये मौ. कौठा ता. जि. नांदेड येथील ग.क्र.80 मधील 08 आर (आठ आर) जमिनीचा चालु वर्षाच्या मुल्यांकनानुसार भोगवटा मुल्याची उर्वरीत रक्कम रु. 45,83,000/- (रु. पंचेचाळीस लाख त्रेऐंशी हजार) दिनांक 28.02.2017 पर्यंत शासनजमा करण्यांच्या पूर्वअटीवर आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना सदर जमीनीचा तात्पुरत्या स्वरुपात ताबा देण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 अन्वये आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी अनर्जित प्राप्तीच्या उर्वरीत रक्कम रु. 45,83,000/- (रु. पंचेचाळीस लाख त्रेऐंशी हजार) चा धनादेश या कार्यालयात जमा केलेला आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 02 अन्वये सहायक संचालक नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, नांदेड यांनी विषयांकित जमीनीबाबत सहायक संचालक नगररचना व मनपा नियमावली यांच्या निर्धारीत अटी व शर्तीचे पालन करण्यांबाबत आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी हमीपत्र यापूर्वीच या कार्यालयास सादर केले असुन त्यानुसार अटी व शर्तीची पूर्तता महानगरपालिकेकडून करण्यांत येईल अशी पूर्वअट निर्धारीत करण्यांत आली आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र.01 च्या शासन अधिसूचना दिनांक 31.12.2015 मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम 1971 मधील नियम 6 मधील नव्याने समाविष्ट करण्यांत आलेले पोट नियम (3)(अ) च्या तरतूदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. कौठा ता. जि. नांदेड येथील ग.क्र.80 मधील 08 आर (आठ आर) शासकीय जमीन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस सार्वजनिक सोयी करिता उपलब्ध करून देणेस्तव संदर्भ क्र.03 अन्वये विषयांकित जमिनीचा चालु वर्षाच्या मुल्यांकनानुसार भोगवटा मुल्याची उर्वरीत रक्कम आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी शासन जमा केली असल्यामुळे खालील इतर अटी व शर्तीवर आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना उपरोक्त जमीनीचा अंतिम ताबा देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. संदर्भ क्र.02 अन्वये सहायक संचालक नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, नांदेड यांनी विषयां कित जमीनीबाबत सहायक संचालक नगररचना व मनपा नियमावली यांच्या खालील निर्धारीत अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहिल.
   - A. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस लागू असलेल्या बांधकामनियंत्रण नियमावलीतील सोई व सुविधा अंतर्गत (Amenity Space) अनुज्ञेय वापराकरिता त्यातील नियमास अधिन राहून वापर करता येऊ शकेल. तसेच वाढीव क्षेत्राची विकास योजना तयार करतांना ती उक्त प्रयोजनासाठी आरक्षित करून ती शासन मंजुरीनंतर विकसीत करता येऊ शकेल.
   - B. जागेवर प्रत्यक्षात अतिक्रमण असल्याने ते काढून घेणे तसेच विद्यमान G.S.R. पासुन सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक राहिल.

( कृपया मागे पहावे )

C. विषयांकित जागा नांदेड-लातूर या राज्यरस्ता/ राज्यमार्गालगत असल्याने ईमारत रेषा/नियंत्रण रेषेबाबत संबंधीत विभागाचे अभिप्राय घेणे योग्य राहिल.

D. जागेवर असलेल्या अनाधिकृत बांधकामे निष्कासित करणेची कार्यवाही करणे आवश्यक राहिल.

3. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा उपयोग कर ण्यांत यावा तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पटटयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.

4. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्यासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.

5. तहसिलदार नांदेड यांनी मोजणी नकाशा व चतु:सिमे प्रमाणे 08 आर जमिनीचा अंतिम ताबा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना हस्तांतरीत करण्यांपूर्वी जमीनीच्या भोगवटामुल्यांची उर्वरीत रक्कम रु. 45,83,000/- शासन जमा झाल्याची शहानिशा करुन अधिकार अभिलेखात नावाची नोंद घेऊन अभिलेखाच्या दोन प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

8. शासन परिपत्रक क्र.जमीन08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 नुसार शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे महापालिका यांना बंधनकारक राहिल. तसेच सदर नमुना क्र.18 च्या बोर्डाचे मजकूर तहसीलदार नांदेड यांचेकडून हस्तगत करावे.

**(स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. उपविभागीय अधिकारी नांदेड यांना माहितीस्तव.
2. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना माहितीस्तव.
3. तहसिलदार नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांचे पत्र दिनांक 16.03.2017.
3. उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांचे कार्यालयीन पत्र दिनांक 12.04.2017.

क्रं.2017/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-09
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. 25 एप्रिल, 2017.

## आदेश

**विषय:- सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत प्रलंबीत असलेले मौ. बेलदरा ता. उमरी येथील ग.क्र.71/अ व ग.क्र. 70 मधील क्षेत्र एकूण 60.00 हे.आर जमीन वनविभागास हस्तांतरीत करणे बाबत.**

ज्याअर्थी संदर्भ क्र.02 अन्वये उपवनसंरक्षक नांदेड वनविभाग नांदेड यांनी सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत मौ. बेलदरा ता. उमरी येथील ग.क्र.71/अ व ग.क्र. 70 मधील क्षेत्र एकूण 60.00 हे.आर जमीन हस्तांतरीत करणे बाबत या कार्यालयास विनंती केली आहे. मौ. बेलदरा ता. उमरी येथील ग.क्र.71/अ व ग.क्र. 70 मधील क्षेत्र एकूण 60.00 हे.आर जमीनीबाबत संदर्भ क्र. 03 अन्वये उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांनी सद्यस्थितीदर्शक अहवाल ज्यात विषयांकित जमीन निर्विवादरित्या उपलब्ध असलेली वनेत्तर जमीन वनविभागास हस्तांतरीत करणे बाबत शिफारस ही केली आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र.01 च्या शासन अधिसूचना दिनांक 31.12.2015 च्या तरतूदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी नांदेड महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22 नुसार मौ. बेलदरा ता. उमरी येथील ग.क्र.71/अ व ग.क्र. 70 मधील क्षेत्र एकूण 60.00 हे.आर वाटपासाठी निर्विवादरित्या उपलब्ध असलेली वनेत्तर जमीन उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांना हस्तांतरणाच्या खालील इतर अटी व शर्तीस अधिन राहून हस्तांतर करण्यांचे आदेशीत करीत आहे.

**हस्तांतरणाच्या अटी व शर्ती:**

1. उपवनसंरक्षक, वनविभाग नांदेड यांना ज्या प्रयोजनासाठी विषयांकित जमीन हस्तांतर करण्यांत येत आहे त्याच प्रयोजनासाठी जो पर्यंत उपयोग होईल तो पर्यंत सदरी जमीन त्यांच्या ताब्यात राहतील.
2. सदरी जमीन त्यांना हस्तांतर किंवा विक्री जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाहीत.
3. त्याच प्रमाणे कोणत्याही शासकीय विभागास सदरील जमीन जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतर करता येणार नाही.
4. हस्तांतर करण्यांत येत असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणापासून सरंक्षण करण्याची जबाबदारी संपूर्णतः वन विभागाची राहील.
5. जेव्हा उपवनसंरक्षक, वनविभाग नांदेड यांना सदरच्या जमीनीची आवश्यकता भासणार नाही तेव्हा त्यांनी सदरील जमीन महसूल विभागास परत करावी लागेल.

**(स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)** स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी नांदेड**

प्रतिलिपी,

1. उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांना देवून कळविण्यांत येते की, सदरी जमिनीचा ताबा तहसीलदार उमरी यांचे कडून घेवून ताबा घेतल्या बाबतचा अहवाल ताबा पावतीसह या कार्यालयास सादर करावा.
2. उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांना माहितीस्तव.
3. तहसिलदार उमरी यांना देवून कळविण्यांत येते की, त्यांनी सदरी जमीनीचा ताबा त्वरीत उपवनसंरक्षक नांदेड यांना देवून ताबा पावती तसेच अधिकार अभिलेखात तत्संबंधीत नोंद घेऊन त्यांची प्रत 15 दिवसांत या कार्यालयास सादर करावी.
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. या कार्यालयाचे आदेश क्र. 92.आरबी.कार्या.2.जमीन.सीआर22/92 दिनांक 11.03.1994.
3. उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांचे पत्र दिनांक 07.08.2016.
4. तहसीलदार हदगांव यांचे कार्यालयीन पत्र दिनांक 21.03.2017.

क्रं.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-22
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. 01 एप्रिल, 2017.

## आदेश

**विषयः- सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत प्रलंबीत असलेले मौ. निवघा ता. हदगांव येथील ग.क्र.110/1 क्षेत्र 5.00 हे.आर जमीन वनविभागास हस्तांतरीत करणे बाबत.**

ज्याअर्थी संदर्भ क्र.03 अन्वये उपवनसंरक्षक नांदेड वनविभाग नांदेड यांनी सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत या कार्यालयाचे आदेश संदर्भ क्र. 02 अन्वये मौ. शिवपूरी ता. हदगांव येथील स.नं. 28 मधील 5.00 वनेत्तर जमीन वनविभागास हस्तांतरीत करण्यांत आलेली असुन सदरील जमीनीवर अतिक्रमण असल्याने त्याबदल्यात मौ. निवघा येथील ग.क्र. 110/1 मधील 5.00 वनेत्तर जमीन ज्यात वनविभागाकडून वनीकरणाचे काम घेण्यांत आले आहे ती जमीन वनविभागास हस्तांतरीत करणे बाबत या कार्यालयास विनंती केली आहे. मौ. निवघा येथील ग.क्र. 110/1 मधील 5.00 वनेत्तर जमीनीबाबत संदर्भ क्र. 04 अन्वये तहसीलदार हदगांव यांनी सद्यस्थितीदर्शक अहवाल ज्यात मौ. निवघा येथील ग.क्र. 110/1 मध्ये 5.00 हे.आर वाटपासाठी निर्विवादरित्या उपलब्ध असलेली वनेत्तर जमीन वनविभागास हस्तांतरीत करणे बाबत शिफारस ही केली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.02 या कार्यालयाचे आदेश क्र. 92.आरबी.कार्या.2.जमीन.सीआर22/92 दिनांक 11.03.1994 अन्वये वनविभागास हस्तांतरीत करण्यांत आलेली मौ. शिवपुरी ता. हदगांव येथील ग.क्र. 28 मधील 5.00 हे.आर वनेत्तर जमीन या आदेशान्वये परत शासन जमा करण्यांत येत आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र.01 च्या शासन अधिसूचना दिनांक 31.12.2015 च्या तरतूदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22 नुसार मौ. निवघा येथील ग.क्र. 110/1 मध्ये 5.00 हे.आर वाटपासाठी निर्विवादरित्या उपलब्ध असलेली वनेत्तर जमीन उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांना हस्तांतरणाच्या खालील इतर अटी व शर्तीस अधिन राहून हस्तांतर करण्यांचे आदेशीत करीत आहे.

**हस्तांतरणाच्या अटी व शर्ती:**

1. उपवनसंरक्षक, वनविभाग नांदेड यांना ज्या प्रयोजनासाठी विषयांकित जमीन हस्तांतर करण्यांत येत आहे त्याच प्रयोजनासाठी जो पर्यंत उपयोग होईल तो पर्यंत सदरी जमीन त्यांच्या ताब्यात राहतील.
2. सदरी जमीन त्यांना हस्तांतर किंवा विक्री जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाहीत.
3. त्याच प्रमाणे कोणत्याही शासकीय विभागास सदरील जमीन जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतर करता येणार नाही.
4. हस्तांतर करण्यांत येत असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संपूर्णतः वन विभागाची राहील.
5. जेव्हा उपवनसंरक्षक, वनविभाग नांदेड यांना सदरच्या जमीनीची आवश्यकता भासणार नाही तेव्हा त्यांनी सदरील जमीन महसूल विभागास परत करावी लागेल.

**(स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांना देवून कळविण्यांत येते की, सदरी जमिनीचा ताबा तहसीलदार हदगांव यांचे कडून घेवून ताबा घेतल्या बाबतचा अहवाल ताबा पावतीसह या कार्यालयास सादर करावा.
2. उपविभागीय अधिकारी हदगांव यांना माहितीस्तव.
3. तहसिलदार हदगांव यांना देवून कळविण्यांत येते की, त्यांनी सदरी जमीनीचा ताबा त्वरीत उपवनसंरक्षक नांदेड यांना देवून ताबा पावती तसेच अधिकार अभिलेखात तत्संबंधीत नोंद घेऊन त्यांची प्रत 15 दिवसांत या कार्यालयास सादर करावी.
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांचे पत्र दिनांक 18.05.2016.
3. उपविभागीय अधिकारी नांदेड यांचे पत्र 2017/जमा/संकीर्ण/सीआर-01 दि.21.04.2017

OFFICE OF THE COLLECTOR * NANDED *

क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-23
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दि. एप्रिल, 2017.
04/05/2017

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भ क्र. 02 व 03 अन्वये उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड व उपविभागीय अधिकारी, नांदेड यांनी भारत निवणुक आयोगाचे ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवण्यासाठी ई.व्ही.एम. (EVM) व (VVPAT) साठवणुक करिता गोदाम सुरक्षा कक्ष बांधण्यासाठी मौ. धनगरवाडी ता.जि. नांदेड येथील गट क्र.67 मधील 1.00 हे. आर गायरान उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती करुन शिफारशीसह प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे.

ज्याअर्थी, सहाय्यक संचालक नगररचना नांदेड यांनी आपले कार्यालयीन पत्र दिनांक 21/12/2016 अन्वये मौ. धनगरवाडी हे गांव नांदेड प्रारुप प्रसिध्द प्रादेशिक योजना नांदेड प्रमाणे नियोजन क्षेत्र हददीबाहेर असून 12 मी. पोंच रस्ता उपलब्ध करुन घेणेच्या अटीवर उक्त वापरासाठी जागा हस्तांतरीत करणेस हरकत नसल्याचे कळविले आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र. 1 वरील महसूल व वन विभागा कडील शासन अधिसूचनेन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. धनगरवाडी ता.जि. नांदेड येथील गट क्र.67 मधील 1.00 हे. आर जमीनचा आगाऊ ताबा ई.व्ही.एम. (EVM) व (VVPAT) साठवणुक करीता गोदाम बांधणेकरीता उपजिल्हा निवडणुक अधिकारी नांदेड यांना (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम 1971) मधील नियम 5 व 6 मधील तरतूदीनूसार तसेच संदर्भ क्रमांक 1 मधील शासन अधिसूचनेतील परि.क्र. 3 (ब) अन्वये भोगाधिकार मुल्य रहीत व सारामाफीने, खालील अटी व शर्तीवर सदर जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून सरंक्षण करण्याची जबाबदारी संबधीत कार्यालयाची राहील.
2. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पटटयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही. विहीत अटी व शर्तीचा भंग झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.
3. महसूल व वन विभागाचे शासन निर्णय दिनांक 11.01.2017 मधील नुसार ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आलेली आहे त्याच प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यांत यावा तसेच जमीन प्रदान आदेशाच्या तारखेपासुन तीन वर्षात कायमस्वरुपी इमारतीचे बांधकाम करणे बंधनकारक राहिल.
4. तहसिलदार नांदेड यांनी मोजणी नकाशा व चतु:सिमे प्रमाणे ग.क्र. 67 मधील 1.00 हे. आर जमिनीचा अंतिम ताबा जिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांना देऊन अधिकार अभिलेखांत त्याबाबतची नोंद घेवून अहवाल /अभिलेख दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.
5. शासन परिपत्रक क्र.जमीन08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 नुसार शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा

( कृपया मागे पहावे )

नमुना 18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांना बंधन कारक राहिल. तसेच सदर बोर्डाचे मजकूर तहसीलदार नांदेड यांचेकडून हस्तगत करावे.

6. सहाय्यक संचालक नगररचना कार्यालय, नांदेड यांनी आपले कार्यालयीन पत्र दि. 21/12/2016 अन्वये दिलेल्या सूचनेप्रमाणे सदर जागेसाठी किमान 12 मी. पोंच रस्ता उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहिल.
7. ठराविक अंतरावर (किमान 100 चौ.मी. च्या अंतरावर एक वृक्ष) झाडे लावणे आवश्यक असून त्यांचे संगोपन करणे बंधनकारक आहे.

**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव.
2. उपविभागीय अधिकारी नांदेड यांना माहितीस्तव.
3. तहसिलदार नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश क्र.2006/मशाका-2/जमीन/टे-2 दि.09/01/2007.
2. तहसिलदार हदगांव यांचे पत्र दिनांक 10.10.2016.
3. या कार्यालयाचे नोटिस जा.क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर दि.02.12.2016

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

क्रं.2017/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-10
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक 23 मे, 2017.

## आदेश

ज्याअर्थी संदर्भ क्रं. 1 वरील या कार्यालयाचे आदेशान्वये मौ. रुई ता. हदगांव जि.नांदेड येथील स.नं. 205 मधील क्षेत्र 2.94 हे.आर जमीन कब्जेहक्काने अनुसूचित जाती मुलां मुलींकरिता शासकीय शाळा व वसतिगृहासाठी विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांना दि. 09/01/2007 रोजी कब्जेहक्काने मंजुर करण्यांत आलेली असुन सदरील विभागाने विषयांकित जमिन ज्या कारणास्तव मंजूर करण्यांत आलेली होती त्या कारणास्तव वापर न करता दि. 09/01/2007 पासुन वापराविना पडित ठेवल्यामुळे संदर्भ क्र. 01 मधील आदेशान्वये दिलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये केलेल्या तपासणीनुसार तपासणी सूची तहसिलदार हदगांव यांनी या कार्यालयास सादर करून उपरोक्त जमीन शासन जमा करून घेण्याबाबत शिफारसीसह अहवाल सादर केलेला आहे.

ज्याअर्थी सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी देण्यांत आलेली होती त्या प्रयोजनाकरिता वापरात न आणल्यामुळे, तसेच आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1)(अ) अन्वये विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांना काही लेखी म्हणणे व खुलासा सादर करण्याकरिता संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये दिलेल्या नोटिसी द्वारे खुलासा सादर करणे बाबत संधी दिल्यांनंतर विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दिनांक 31.12.2016 अन्वये मौ. हदगांव ता. हदगांव येथील स.नं. 226/15 पैकी 4 एकर जमीनीवर इमारत बांधकाम करून 2011 पासून कार्यरत करण्यांत आलेली असल्या कारणामुळे सदरील ठिकाणी त्यांचे कार्यालयाकडून शासकीय वसतीगृह व निवासी शाळेकरिता इमारत बांधकाम प्रस्तावित नसल्याचे खुलासा सादर केलेला आहे.

त्याअर्थी मी जिल्हाधिकारी, नांदेड महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1) व कलम 59 अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांना कब्जेहक्काने प्रदान केलेली मौ. रुई ता. हदगांव जि.नांदेड येथील स.नं. 205 मधील क्षेत्र 2.94 हे.आर जमीन शर्तभंग झाल्याची खात्री झाली असल्यामुळे शासन जमा करण्यांत येत आहे.
(स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी**

1. उपविभागीय अधिकारी, हदगांव यांना माहितीस्तव.
2. तहसीलदार हदगांव यांना देवून आदेशित करण्यांत येते की, उपरोक्त जमीन ताब्यात घेऊन अधिकार अभिलेखात नोंद घेऊन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.
3. विशेष समाज कल्याण अधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव.
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता**

**वाचा:-** 1. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. या कार्यालयाचे आदेश क्र. 2012/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर दिनांक 18.03.2013.
3. दुय्यम निबंधक श्रेणी-1, मुदखेड यांचे पत्र दिनांक 27.07.2016
4. तहसीलदार मुदखेड यांचे पत्र दिनांक 02.03.2017.

क्र.2012/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-210
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक : 20 जुन, 2017

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

**<u>सुधारीत आदेश</u>**

ज्याअर्थी संदर्भ क्र. 03 अन्वये दुय्यम निबंधक श्रेणी-1, मुदखेड यांनी या कार्यालयाचे आदेश संदर्भ क्र. 02 अन्वये दुय्यम निबंधक श्रेणी-1 मुदखेड कार्यालयाच्या इमारतीसाठी 0.025 हे.आर म्हणजेच 250 चौ.मी. जमीन मुदखेड येथील ग.क्र. 579 मधील तहसील कार्यालयाचे परिसरात उपलब्ध करून देण्यांत आलेली असुन सदर जमीनीमध्ये इमारतीचे बांधकाम करणे शक्य नसल्याचे सहायक अभियंता श्रेणी -1, सां.बां.उपविभाग नांदेड यांनी कळविले असल्यामुळे याच परिसरात आणखी वाढीव 0.025 हे.आर (250 चौ.मी.) जागा उपलब्ध करून देणे बाबतच्या विनंतीच्या अनुषंगाने तहसीलदार मुदखेड यांनी संदर्भ क्र. 4 अन्वये या कार्यालयाचे आदेश क्र. 2012/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर दिनांक 18.03.2013 अन्वये प्रदान करण्यांत आलेली 0.025 हे.आर (250 चौ.मी.) शासन जमा करून ग.क्र. 579 मधील मुदखेड तहसील कार्यालयाचे परिसरातील उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, मुदखेड च्या लगत उपलब्ध असलेली 0.05 हे.आर (पाच आर) जमीन उपलब्ध करून देणे बाबतचा प्रस्ताव सादर करून शिफारसही केली आहे.

ज्याअर्थी या कार्यालयाचे आदेश क्र. 2012/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर दिनांक 18.03.2013 अन्वये प्रदान करण्यांत आलेली मौ. मुदखेड मधील ग.क्र. 579 मधील तहसील कार्यालयाचे परिसरात उपलब्ध 0.025 हे.आर (250 चौ.मी.) जमिनीत इमारतीचे बांधकाम करणे शक्य नसल्यामुळे सदरील जमीन प्रस्तुत आदेशान्वये परत शासन जमा करण्यांत येत आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र. 1 वरील महसूल व वन विभागा कडील शासन अधिसूचनेन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी नांदेड ग.क्र. 579 मधील मुदखेड तहसील कार्यालयाचे परिसरातील उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, मुदखेड च्या लगत उपलब्ध असलेली 0.05 हे.आर (पाच आर) जमीन उपलब्ध करून देण्याबाबत दुय्यम निबंधक श्रेणी-1, मुदखेड यांना (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम 1971) मधील नियम 5 व 6 मधील तरतूदीनूसार तसेच संदर्भ क्रमांक 1 मधील शासन अधिसूचनेतील परि.क्र. 3 (ब) अन्वये भोगाधिकार मुल्य रहीत व सारामाफीने, खालील अटी व शर्तीवर सदर जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून सरंक्षण करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील. तसेच सदरील जमीनीचा वापर दोन वर्षात करणे बंधनकारक राहिल.
2. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पट्टयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
3. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.
4. तहसिलदार मुदखेड यांनी संबधीत यंत्रणेस उपरोक्त जमिनीचा अंतिम ताबा दुय्यम निबंधक श्रेणी-1, मुदखेड यांना दयावा तसेच अधिकार अभिलेखांत तत्संबधीत नोंदी घेवून अहवाल/ अभिलेख तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावेत.
5. या कार्यालयाचे आदेश दिनांक 18.03.2013 अन्वये यापूर्वी प्रदान करण्यांत आलेली मौ. मुदखेड मधील ग.क्र. 579 मधील 0.025 हे.आर (250 चौ.मी.) जमीन शासन जमा करून घेऊन अनुपालन या कार्यालयास सादर करावे.
6. शासन परिपत्रक क्र. जमीन 08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 अन्वये शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना क्र.18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे संबंधीत विभागावर बंधनकारक राहिल.

**(स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. उपविभागीय अधिकारी, भोकर यांना माहितीस्तव.
2. तहसिलदार मुदखेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
3. दुय्यम निबंधक श्रेणी-1, मुदखेड यांना माहितीस्तव
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. शासन परिपत्रक महसूल व वन विभाग दिनांक 30.11.2012.
3. कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांचे पत्र दिनांक 23.12.2015.
4. उपविभागीय अधिकारी, देगलूर यांचे पत्र क्र. 2016/भुसं/पुनर्वसन/कावी-649 दिनांक 07.11.2016.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-24
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक : 22 जुन, 2017

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भ क्र. 03 अन्वये कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांनी मौ. हसनाळ (प.मु.) ता. मुखेड च्या पुनर्वसनासाठी ग.क्र. 53 मधील शासकीय गायरान जमीन क्षेत्र 0.30 हे.आर जमीन उपलब्ध करून देणे बाबत विनंती केली असुन त्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव संदर्भ क्र. 04 अन्वये उपविभागीय अधिकारी देगलूर यांनी या कार्यालयास सादर करून शिफारसही केली आहे.

ज्याअर्थी उपरोक्त गायरान जमीन मौ. हसनाळ (प.मु) ता. मुखेड या गावाच्या पुनर्वसनासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ देगलूर यांना आवश्यक असल्यामुळे संदर्भ क्र. 02 मधील शासन परिपत्रकात दर्शविण्यांत आलेली तरतूद परि.क्र. 2 (2) नुसार राज्य शासनाच्या अख्त्यारीतील महामंडळांना आगावू ताबा देण्यांपूर्वी प्रचलित बाजारमुल्यानुसार संपूर्ण किंमत आकारण्यांत यावी असे स्पष्ट निर्देश असल्यामुळे चालु वर्ष 2017-18 चे मुल्यांकनानुसार अनर्जित प्राप्तीची रक्कम रुपये 11,34,000/-(अकरा लक्ष चौतीस हजार रुपये) ग्रास चालान द्वारे शासन जमा करण्यांत आले आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र. 01 वरील महसूल व वन विभागा कडील शासन अधिसूचनेन्वये व संदर्भ क्र. 02 मधील शासन परिपत्रकानुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. हसनाळ (प.मु.) ता. मुखेड च्या पुनर्वसनासाठी ग.क्र. 53 मधील शासकीय गायरान जमीन क्षेत्र 0.30 हे.आर जमीन उपलब्ध करून देण्याबाबत कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांना संदर्भ क्रमांक 01 मधील शासन अधिसूचनेतील सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम 1971 मधील नियम 6 मध्ये नव्याने समाविष्ट करण्यांत आलेले पोटनियम 3 (अ) अन्वये वाटपासाठी निर्विवाद असलेल्या उपरोक्त जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून सरंक्षण करण्याची तसेच सदरील जमीनीचा वापर दोन वर्षात करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील..
2. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पट्टयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
3. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.
4. तहसिलदार मुखेड यांनी संबधीत यंत्रणेस उपरोक्त जमिनीचा अंतिम ताबा कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांना दयावा तसेच अधिकार अभिलेखांत तत्संबधीत नोंदी घेवून अहवाल/ अभिलेख तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावेत.
5. शासन परिपत्रक क्र. जमीन 08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 अन्वये शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना क्र.18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे संबंधीत विभागावर बंधनकारक राहिल.

**स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. उपविभागीय अधिकारी, देगलूर यांना माहितीस्तव.
2. तहसिलदार मुखेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
3. कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प विभाग, देगलूर यांना माहितीस्तव
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

**वाचा:-** 1. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांचे पत्र दिनांक 02.02.2015
3. उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांचे पत्र दिनांक 19.05.2016.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-09
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक : 22 जुन, 2017

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भ क्र. 02 अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी मौ. गोळेगांव ता. उमरी येथील ग.क्र. 24 मधील क्षेत्र 1.40 हे.आर शासकीय गायरान जमीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारत बांधकामासाठी मागणीच्या अनुषंगाने सदरील जमीन उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. 03 अन्वये उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांनी या कार्यालयास सादर करुन तशी शिफारसही केली आहे.

ज्याअर्थी प्रपत्र ब नुसार मागणी केलेले क्षेत्र वजा जाता शिल्लक राहणारे गायरान क्षेत्र हे सदर गावाच्या लागवडीलायक क्षेत्राच्या 5 टक्के पेक्षा कमी राहत असल्याचे दिसुन येते. परंतु शासन महसूल व वनविभागाचे शासन परिपत्रक दिनांक 28.06.1999 मधील तरतुदीनुसार परि.क्र. 2 (1) नुसार सर्वागीण ग्रामीण विकासाच्या दृष्टीने मुलभूत नागरी सुविधा ज्यात दवाखान्याचा समावेश होतो त्या प्रयोजनासाठी जमिनीची आवश्यकता असेल आणि सदर प्रयोजनासाठी अन्य शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास किमान 5 टक्के गायरान जमीनीची अट शिथील करुन सदर प्रयोजनासाठी जमीन उपलब्ध करुन घेणे बाबतची स्पष्ट तरतूद असल्यामुळे किमान 5 टक्के गायरान जमीनीची अट सदर प्रकरणांत शिथील करण्यांत येत आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र. 1 वरील महसूल व वन विभागा कडील शासन अधिसूचनेन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. गोळेगांव ता. उमरी येथील ग.क्र. 24 मधील क्षेत्र 1.40 हे.आर शासकीय गायरान जमीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारत बांधकामासाठी मागणीच्या अनुषंगाने सदरील जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम 1971) मधील नियम 5 व 6 मधील तरतूदीनूसार तसेच संदर्भ क्रमांक 1 मधील शासन अधिसूचनेतील परि.क्र. 3 (ब) अन्वये भोगाधिकार मुल्य रहीत व सारामाफीने, खालील अटी व शर्तीवर सदर जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील. तसेच सदरील जमीनीचा वापर दोन वर्षात करणे बंधनकारक राहिल.
2. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पट्टयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
3. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.
4. तहसिलदार उमरी यांनी संबधीत यंत्रणेस उपरोक्त जमिनीचा अंतिम ताबा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना दयावा तसेच अधिकार अभिलेखांत तत्संबधीत नोंदी घेवून अहवाल/ अभिलेख तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावेत.
5. ठराविक अंतरावर (100 मी. प्रमाणे) झाडे लावणे आवश्यक असून त्यांचे संगोपन व संवर्धन करणे विभागास बंधनकारक राहिल.
6. शासन परिपत्रक क्र. जमीन 08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 अन्वये शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना क्र.18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे संबंधीत विभागावर बंधनकारक राहिल.

**(स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांना माहितीस्तव.
2. तहसिलदार उमरी यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
3. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना माहितीस्तव
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**

वाचा:- 1. जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश क्र.2007/मशाका-2/जमीन/टे-2सिआर-19 दि.23/08/2007.
2. तहसिलदार बिलोली यांचे पत्र दिनांक 01.10.2016.
3. या कार्यालयाचे नोटिस जा.क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर दि.30.11.2016.
4. विशेष समाज कल्याण अधिकारी, नांदेड यांचा खुलासा दिनांक 31.12.2016.

क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-25
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक: 28 जुन, 2017.

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भ क्रं. 1 वरील या कार्यालयाचे आदेशान्वये मौ. बिलोली ता. बिलोली जि.नांदेड येथील स.नं. 81/अ (गावठाण वार्ड क्र. 11 व 12) मधील क्षेत्र 2.60 हे.आर जमीन अनुसूचित जाती मुलां मुलींकरिता शासकीय निवासी शाळा व वसतिगृहासाठी विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांना दि. 23/08/2007 रोजी कब्जेहक्काने मंजुर करण्यांत आलेली असुन सदरील विभागाने विषयांकित जमिन ज्या कारणास्तव मंजूर करण्यांत आलेली होती त्या कारणास्तव वापर न करता संबंधीतांनी सदर जमीन वापराविना पडित ठेवल्यामुळे संदर्भ क्र. 01 मधील आदेशान्वये दिलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये तहसिलदार बिलोली यांनी केलेल्या तपासणीनुसार तपासणी सूची व पंचनामा अहवाल या कार्यालयास सादर करुन उपरोक्त जमीन शासन जमा करुन घेण्याबाबत शिफारसीसह अहवाल सादर केलेला आहे.

ज्याअर्थी सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी देण्यांत आलेली होती त्या प्रयोजनाकरिता वापरात न आणल्यामुळे, तसेच आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1)(अ) अन्वये विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांना काही लेखी म्हणणे व खुलासा सादर करण्याकरिता संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये दिलेल्या नोटिसी द्वारे खुलासा सादर करणे बाबत संधी दिल्यांनंतर विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी संदर्भ क्र. 4 अन्वये खुलासा सादर करुन उपरोक्त ठिकाणी निवासी शाळा व वसतिगृह प्रस्तावित असुन त्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देणे बाबतची विनंती या कार्यालयास केली आहे.

त्याअर्थी विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी सादर केलेला उपरोक्त खुलासा समाधानकारक नसल्यामुळे मी जिल्हाधिकारी, नांदेड महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1) व कलम 59 अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांना कब्जेहक्काने अनुसूचित जाती मुलां मुलींकरिता शासकीय निवासी शाळा व वसतिगृहासाठी प्रदान केलेली मौ. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथील स.नं. 81/अ (गावठाण वार्ड क्र. 11 व 12) मधील 2.60 हे.आर शासकीय गायरान जमीन शर्तभंग झाल्याची खात्री झाली असल्यामुळे शासन जमा करण्यांत येत आहे.

**(स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी**

1. उपविभागीय अधिकारी, बिलोली यांना माहितीस्तव.
2. तहसीलदार बिलोली यांना देवून आदेशित करण्यांत येते की, उपरोक्त जमीन ताब्यात घेऊन विषयांकित जमीनीवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्यांत येऊन अधिकार अभिलेखात नोंद घेऊन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.
3. विशेष समाज कल्याण अधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव.
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता**

वाचा:- 1. जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश क्र. आरबी-लॅड-2 सीआर 24/1985 दिनांक 01.10.1985.
2. तहसिलदार किनवट यांचे पत्र दिनांक 10.11.2016.
3. या कार्यालयाचे नोटिस जा.क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर दि.13.12.2016.
4. जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांचा खुलासा दिनांक 23.12.2016.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-26
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक: 28 जुन, 2017.

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भ क्रं. 1 वरील या कार्यालयाचे आदेशान्वये मौ. किनवट ता. किनवट जि.नांदेड येथील स.नं. 263 मधील क्षेत्र 0.92 हे.आर जमीन होमगार्ड परेड ग्राउंडसाठी जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांना दि. 01.10.1985 रोजी कब्जेहक्काने मंजुर करण्यांत आलेली असुन सदरील विभागाने विषयांकित जमिन ज्या कारणास्तव मंजूर करण्यांत आलेली होती त्या कारणास्तव वापर न करता वापराविना पडित ठेवल्यामुळे संदर्भ क्र. 01 मधील आदेशान्वये दिलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये तहसिलदार किनवट यांनी केलेल्या तपासणीनुसार तपासणी सूची व पंचनामा अहवाल या कार्यालयास सादर करुन उपरोक्त जमीन शासन जमा करुन घेण्याबाबत शिफारसीसह अहवाल सादर केलेला आहे.

ज्याअर्थी सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी देण्यांत आलेली होती त्या प्रयोजनाकरिता वापरात न आणल्यामुळे, तसेच आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1)(अ) अन्वये जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांना काही लेखी म्हणणे व खुलासा सादर करण्याकरिता संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये दिलेल्या नोटिसी द्वारे खुलासा सादर करणे बाबत संधी दिल्यांनंतर जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांनी संदर्भ क्र. 4 अन्वये खुलासा सादर करुन उपरोक्त ठिकाणी अतिक्रमण करुन झोपडपट्टी वसविली असल्यामुळे त्या जागेवर बळपूर्वक परेड घेण्यांचा प्रयत्न केल्यास त्याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्यांची शक्यता असल्यामुळे सदरील बेकायदेशीर अतिक्रमण हटविल्यास सदरील जागेभोवती काटेरी कुंपण घालून कार्यालयाची इमारत बांधण्यांचा मानस असले बाबतची विनंती या कार्यालयास केली आहे.

त्याअर्थी जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांनी सादर केलेला उपरोक्त खुलासा समाधानकारक नसल्यामुळे मी जिल्हाधिकारी, नांदेड महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1) व कलम 59 अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांना कब्जेहक्काने होमगार्ड परेड ग्राउंडसाठी प्रदान करण्यांत आलेली मौ. किनवट ता. किनवट जि.नांदेड येथील स.नं. 263 मधील क्षेत्र 0.92 हे.आर जमीन शासकीय गायरान जमीन शर्तभंग झाल्याची खात्री झाली असल्यामुळे शासन जमा करण्यांत येत आहे.

**(स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी**

1. उपविभागीय अधिकारी, किनवट यांना माहितीस्तव.
2. तहसीलदार किनवट यांना देवून आदेशित करण्यांत येते की, उपरोक्त जमीन ताब्यात घेऊन स.नं. 263 मधील क्षेत्र 0.92 हे.आर जमीनीवर असलेले अतिक्रमण तातडीने काढण्यांत येऊन व सदर जमीनीवर पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेऊन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.
3. जिल्हा समादेशक होमगार्ड, नांदेड यांना माहितीस्तव.
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता**

वाचा:- 1. जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश क्र. आरबी-लँड-2 सीआर 112/1982 दिनांक 01.09.1982.
2. तहसिलदार किनवट यांचे पत्र दिनांक 10.11.2016.
3. या कार्यालयाचे नोटिस जा.क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर दि.13.12.2016.
4. संचालक एकात्मिक आदिवासी विकास विभाग, किनवट यांचा खुलासा दिनांक 28.12.2016.

क्र.2016/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-27
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक: 30 जुन, 2017.

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भ क्रं. 1 वरील या कार्यालयाचे आदेशान्वये मौ. मोहपूर ता. किनवट जि.नांदेड येथील स.नं. 175/1 मधील क्षेत्र 4.00 हे.आर जमीन आदिवासी आश्रमशाळेसाठी संचालक एकात्मिक आदिवासी विकास विभाग, किनवट यांना दि. 01.09.1982 रोजी कब्जेहक्काने मंजुर करण्यांत आलेली असुन सदरील विभागाने विषयांकित जमिन ज्या कारणास्तव मंजूर करण्यांत आलेली होती त्या कारणास्तव वापर न करता वापराविना पडित ठेवल्यामुळे संदर्भ क्र. 01 मधील आदेशान्वये दिलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये तहसिलदार किनवट यांनी केलेल्या तपासणीनुसार तपासणी सूची व पंचनामा अहवाल या कार्यालयास सादर करुन उपरोक्त जमीन शासन जमा करुन घेण्याबाबत शिफारसीसह अहवाल सादर केलेला आहे.

ज्याअर्थी सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी देण्यांत आलेली होती त्या प्रयोजनाकरिता वापरात न आणल्यामुळे, तसेच आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1)(अ) अन्वये संचालक एकात्मिक आदिवासी विकास विभाग, किनवट यांना काही लेखी म्हणणे व खुलासा सादर करण्याकरिता संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये दिलेल्या नोटिसी द्वारे खुलासा सादर करणे बाबत संधी दिल्यांनंतर संचालक एकात्मिक आदिवासी विकास विभाग, किनवट यांनी संदर्भ क्र. 4 अन्वये खुलासा सादर करुन आदिवासी आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम स.नं. 246 मध्ये करण्यांत आलेले असल्यामुळे स.नं. 175/1 मधील 4.00 हे.आर जमीनीवर बांधकाम करण्यांत आलेले नाही भविष्यात या जमीनीवर बांधकाम करण्यांची शक्यता असल्याबाबत या कार्यालयास कळविले आहे.

त्याअर्थी संचालक एकात्मिक आदिवासी विकास विभाग, किनवट यांनी सादर केलेला उपरोक्त खुलासा समाधानकारक नसल्यामुळे मी जिल्हाधिकारी, नांदेड महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 53 (1) व कलम 59 अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन संचालक एकात्मिक आदिवासी विकास विभाग, किनवट यांना कब्जेहक्काने आदिवासी आश्रमशाळेसाठी प्रदान करण्यांत आलेली मौ. मोहपूर ता. किनवट जि.नांदेड येथील स.नं. 175/1 मधील क्षेत्र 4.00 हे.आर जमीन शासकीय गायरान जमीन शर्तभंग झाल्याची खात्री झाली असल्यामुळे शासन जमा करण्यांत येत आहे.

**(स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी**

1. उपविभागीय अधिकारी, किनवट यांना माहितीस्तव.
2. संचालक, एकात्मिक आदिवासी विकास विभाग, किनवट यांना माहितीस्तव.
3. तहसीलदार किनवट यांना देवून आदेशित करण्यांत येते की, उपरोक्त जमीन ताब्यात घेऊन सदर जमीनीवर पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेऊन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता**

वाचा:- 1. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 31.12.2015.
2. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचे पत्र दिनांक 18.07.2016.
3. उपविभागीय अधिकारी, हदगांव यांचे पत्र दिनांक 07.12.2016.

क्रं.2007/मशाका-2/जमीन/टे-2/सिआर-210
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक : 03 जुलै, 2017

**आदेश**

ज्याअर्थी संदर्भ क्र. 02 अन्वये प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांनी मौ. हिमायतनगर ता. हिमायतनगर येथील ग.क्र. 353 मधील क्षेत्र 1.20 हे.आर शासकीय जमीन हिमायतनगर न्यायालय इमारत व न्यायाधीश निवासस्थानाच्या बांधकामासाठी मागणीच्या अनुषंगाने सदरील जमीन उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. 03 अन्वये उपविभागीय अधिकारी, हदगांव यांनी या कार्यालयास सादर करुन तशी शिफारसही केली आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र. 1 वरील महसूल व वन विभागा कडील शासन अधिसूचनेन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नांदेड मौ. हिमायतनगर ता. हिमायतनगर येथील ग.क्र. 353 मधील क्षेत्र 1.20 हे.आर शासकीय जमीन हिमायतनगर न्यायालय इमारत व न्यायाधीश निवासस्थानाच्या बांधकामासाठी मागणीच्या अनुषंगाने सदरील जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांना (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम 1971) मधील नियम 5 व 6 मधील तरतूदीनूसार तसेच संदर्भ क्रमांक 1 मधील शासन अधिसूचनेतील परि.क्र. 3 (ब) अन्वये भोगाधिकार मुल्य रहीत व सारामाफीने, खालील अटी व शर्तीवर सदर जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

1. जमिनीचा अंतिम ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची राहील. तसेच सदरील जमीनीचा वापर दोन वर्षात करणे बंधनकारक राहिल.
2. ज्या प्रयोजनासाठी जमीन निहीत करण्यात आली आहे. त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा उपयोग करावा. तसेच सदर जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून धारण करील व ही जमीन गहाण विक्री किंवा खाजगी इसमांना पट्टयावर किंवा शासकीय इतर विभागास जिल्हाधिकारी नांदेड यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.
3. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी.
4. तहसिलदार हिमायतनगर यांनी संबधीत यंत्रणेस उपरोक्त जमिनीचा अंतिम ताबा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांना दयावा तसेच अधिकार अभिलेखांत तत्संबधीत नोंदी घेवून अहवाल/ अभिलेख तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावेत.
5. ठराविक अंतरावर (100 मी. प्रमाणे) झाडे लावणे आवश्यक असून त्यांचे संगोपन व संवर्धन करणे विभागास बंधनकारक राहिल.
6. शासन परिपत्रक क्र. जमीन 08/2012/प्रक्र 51/ज-1 दिनांक 23.10.2012 अन्वये शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम 49 अन्वये जमीन मंजुरीचा नमुना क्र.18 चा कायमस्वरुपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे संबंधीत विभागावर बंधनकारक राहिल.

**(स्थळप्रतीवर मा.जि.अ.यांची स्वाक्षरी असे)**

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी,**

1. उपविभागीय अधिकारी, हदगांव यांना माहितीस्तव.
2. तहसिलदार हिमायतनगर यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
3. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांना माहितीस्तव
4. आदेश संचिका

**जिल्हाधिकारी नांदेड करिता.**